सत्यमेव जयते
# जिल्हाधिकारी कार्यालय, बीड (आस्थापना शाखा)
फोन क्र.०२४४२/२२२६०४ फॅक्स क्र.०२४४२/२२२०११

------------------------------------------------------------------------

## महाराष्ट्र शासन - महसूल विभाग
## जिल्हा निवड समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड.
## तलाठी, लिपिक - नि - टंकलेखक, वाहनचालक व शिपाई पदभरती 2014.

जाहिरात क्रमांक - 2014/आरबी-डेस्क/आस्था-1/कावि 698 दिनांक 13/05/2014.

**1.** शासन महसूल व वन विभागाकडील निर्णय क्र. एसआरव्ही-2012/प्र.क्र.186/12, दिनांक 28/02/2013, शासन निर्णय क्र पदभरती 2013/प्रक्र 147/ई-10 दिनांक 26/02/2014 तसेच मा. अपर मुख्य सचिव महसूल व वन विभाग यांचे अशा पत्र क्र. पदभरती 2013/प्र.क्र147/ई-10 दिनाक 29/04/2014 तसेच शासनाने वेळोवेळी निर्देशित केलेनुसार बीड जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आस्थापनेवरील तलाठी, लिपिक - नि - टंकलेखक, वाहनचालक व शिपाई या संवर्गातील अनुशेषाची रिक्त पदे भरण्यासाठी खाली नमुद केलेल्या प्रवर्गातील पात्र उमेदवारांकडून या जाहिरातीव्दारे **दिनांक 15/05/2014 ते 29/05/2014**पर्यंत ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

**1. तलाठी संवर्ग रिक्त पदे (वेतन श्रेणी 5200 - 20200 ग्रेड पे 2400).**

| अ. क्र. | प्रवर्ग | सामाजिक आरक्षण | समांतर आरक्षणानुसार भरावयाची पदे | | | | | | संमातर आरक्षणा शिवायची पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | महिला 30 % | माजी सैनिक 15 % | अंशकालीन पदवीधर/पदविकाधारक 10 % | प्रकल्प-ग्रस्त 5 % | भुंकप-ग्रस्त 2 % | खेळाडू 5 % | |
| 1 | अ.जा. | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 2 | अ.ज. | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 3 | विजाअ | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 4 | भजब | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 5 | भजक | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 |
| 6 | भजड | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 |
| 7 | विमाप्र | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 8 | इमाव | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 9 | खुला | 5 | 2 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 3 |
| | **एकूण** | **7** | **2** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **5** |

**2. लिपिक-नि-टंकलेखक संवर्गातील रिक्त पदे (वेतन श्रेणी 5200-20200 ग्रेड पे 1900)**

| अ. क्र. | प्रवर्ग | सामाजिक आरक्षण | समांतर आरक्षणानुसार भरावयाची पदे | | | | | | संमातर आरक्षणा शिवायची पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | महिला 30 % | माजी सैनिक 15 % | अंशकालीन पदवीधर /पदविकाधारक 10 % | प्रकल्प-ग्रस्त 5 % | भुंकप-ग्रस्त 2 % | खेळाडू 5 % | |
| 1 | अ.जा | 7 | 2 | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 3 |
| 2 | अ.ज. | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 |
| 3 | विजाअ | 2 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 |
| 4 | भजब | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 |
| 5 | भजक | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 6 | भजड | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 |
| 7 | विमाप्र | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | इमाव | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 |
| 9 | खुला | 4 | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 2 |
| | **एकूण** | **17** | **4** | **2** | 1 | 0 | 0 | 0 | **10** |

**3. वाहनचालक संवर्गातील रिक्त पदे (वेतन श्रेणी 5200-20200 ग्रेड पे 1900)**

| अ. क्र. | प्रवर्ग | सामाजिक आरक्षण | समांतर आरक्षणानुसार भरावयाची पदे | | | | | | संमातर आरक्षणा शिवायची पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | महिला 30 % | माजी सैनिक 15 % | अंशकालीन पदवीधर /पदविकाधारक 10 % | प्रकल्प-ग्रस्त 5 % | भुंकंप-ग्रस्त 2 % | खेळाडू 5 % | |
| 1 | अ.जा | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 2 | अ.ज. | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 |
| 3 | विजाअ | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 4 | भजब | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 |
| 5 | भजक | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 |
| 6 | भजड | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 7 | विमाप्र | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 8 | इमाव | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 9 | खुला | 3 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 3 |
| | **एकूण** | **6** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **6** |

**4. शिपाई संवर्गातील रिक्त पदे (वेतन श्रेणी 4440-7440 ग्रेड पे 1300)**

| अ. क्र. | प्रवर्ग | सामाजिक आरक्षण | समांतर आरक्षणानुसार भरावयाची पदे | | | | | | संमातर आरक्षणा शिवायची पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | महिला 30 % | माजी सैनिक 15 % | अंशकालीन पदवीधर /पदविकाधारक 10 % | प्रकल्प-ग्रस्त 5 % | भुंकंप-ग्रस्त 2 % | खेळाडू 5 % | |
| 1 | अ.जा | 3 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2 |
| 2 | अ.ज. | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 |
| 3 | विजाअ | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 4 | भजब | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 5 | भजक | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 6 | भजड | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 7 | विमाप्र | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 8 | इमाव | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 9 | खुला | 3 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2 |
| | **एकूण** | **7** | **2** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **5** |

जिल्हाधिकारी कार्यालय, बीड (आस्थापना शाखा)
फोन क्र.०२४४२/२२२६०४ फॅक्स क्र.०२४४२/२२२०११

---

**3. शैक्षणिक अर्हता:-**

**जाहिरातीतील पदासाठी खाली नमूद केलेली शैक्षणिक अर्हता दिनांक 13/05/2014 रोजी धारण करणे आवश्यक आहे.**

| अ.क्र. | संवर्ग | किमान शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| 1 | तलाठी | मान्यताप्राप्त विद्यापीठाची कुठल्याही शाखेतील पदवी परीक्षा उत्तीर्ण तसेच शासनाने त्याच्याशी समतूल्य म्हणून जाहीर केलेली अर्हता |
| 2 | लिपीक-नि-टंकलेखक | अ) एस.एस.सी.(शालांत प्रमाणपत्र परीक्षा) उत्तीर्ण<br>ब) टंकलेखनाची शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र मराठी 30 शब्द प्रति मिनीट किंवा इंग्रजी 40 शब्द प्रति मिनीट उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. (शासनमान्य व्यावसायिक प्रमाणपत्र आवश्यक) |
| 3 | वाहनचालक | अ) किमान इयत्ता चौथी परिक्षा उत्तीर्ण लिहिता वाचता येणे आवश्यक आहे.<br>ब) मोटार वाहन कायदा १९८८ नुसार हलके मोटार वाहन (LMV) चालविण्याचा वैध परवाना.<br>क) उमेदवार हा शारिरीक दृष्टया सक्षम असावा.<br>ड) मोटार वाहन दुरुस्तीचे जूजबी ज्ञान असणे आवश्यक आहे.<br>ई) वरील कायदयातंर्गत तीन वर्ष मोटार सायकल व्यतिरिक्त इतर वाहन चालविण्याचा अनुभव असावा. |
| 4 | शिपाई | किमान इयत्ता चौथी परिक्षा उत्तीर्ण लिहिता वाचता येणे आवश्यक आहे. |

**4. <u>वयोमर्यादा:-</u> सर्वसाधारणत: दिनांक 13/5/2014 रोजी उमेदवाराचे वय वर्ष 18 पेक्षा कमी व 33 पेक्षा जास्त नसावे. शासन तरतूदीनुसार खालील समातंर आरक्षणाकरिता दर्शविल्याप्रमाणे उच्चवयोमर्यादेला शिथीलता प्रदान करण्यात आलेली आहे.**

| | | |
|---|---|---|
| 1 | मागासवर्गीय उमेदवार | 38 वर्ष |
| 2 | अपंग/प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त/ स्वातंत्र्य सैनिकाचे नामनिर्देशन पाल्य | 45 वर्ष |
| 3 | अंशकालीन उमेदवार | 46 वर्ष |
| 4 | माजीसैनिक उमेदवार | सशस्त्र दलात किमान 06 महिने सेवा केलेल्या माजी सैनिकामधील त्यांनी सशस्त्र दलात केलेला अखंड सेवाकाल +03 वर्ष एवढा काल त्यांच्या विहित दिनांकाच्या वयातून वगळून त्या दिनांकास येणारे त्यांचे वय विचारात घेतले जाईल. अपंग माजी सैनिकासाठी वयोमर्यादा 45 पर्यंत राहील |
| 5 | खेळाडू | 5 वर्षाची अट शिथील(खुला प्रवर्ग 33+5 म्हणजे 38 आणि मागासवर्गीय 38+5 म्हणजे 43 ) |
| 6 | 1991 चे जनगणना कर्मचारी व 1994 नंतरचे निवडणूक कर्मचारी | कमाल वयोमर्यादा 45 वर्ष इतकी राहील या घटकातील मागासवर्गीय उमेदवारासाठी उच्चतम वयोमर्यादा 45 वर्ष इतकीच राहील. |

**5. परीक्षा शुल्क (फी) :-**

| | **खुला प्रवर्ग** | **मागास प्रवर्ग** |
|---|---|---|
| अ) तलाठी, लिपिक नि टंकलेखक, वाहनचालक व शिपाई पदासाठी | रु. 400/- | 200/- |

ब) माजी सैनिक उमेदवारांकरिता परीक्षा शुल्क लागु नाही.

---

उक्त परीक्षा शुल्क स्टेट बँक ऑफ इडिया बँकेच्या कोणत्याही शाखेत ऑनलाईन अर्जासोबत प्राप्त झालेल्या चलनाव्दारे भरणे.

**6. टिप :-**

1. सदरच्या जाहिरातीमध्ये दर्शविलेल्या रिक्त पदाच्या संख्येत कमी / जास्त बदल होण्याची शक्यता आहे. काही अपरिहार्य कारणाने परीक्षा स्थगित झाल्यास त्याबाबत अर्जदाराला कोणताही दावा सांगता येणार नाही. परीक्षेचा प्रकार, पदाची संख्या, समांतर आरक्षण व सामाजिक आरक्षण याबाबत बदल करणे, परीक्षा स्थगित करणे व रद्द करणे, अंशत बदल करणे तसेच सेवा भरती प्रक्रियेत बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार जिल्हा निवड समिती बीड स्वतःकडे राखून ठेवत आहेत. सदर भरती प्रक्रियेसंदर्भात उदभवणारे वाद, तक्रारी इत्यादीबाबत सदर समितीचा निर्णय अंतिम राहील.
2. महाराष्ट्र शासन वित्त विभागाकडील शासन निर्णय क्र. असंक/1025/प्र.क्र.21/भाग दिनांक 24/01/2006 अन्वये शासनाने विभागीय स्तरावर निर्माण केलेले अतिरिक्त संवर्ग कक्षाकडे उमेदवार उपलब्ध झाल्यास त्याप्रमाणे पदे कमी होण्याची शक्यता आहे.
3. महिला व बालकल्याण विभागाचे शासन निर्णय क्रं. 82 /2001/अशेआ-2000/प्रक्र 415/का-2 दि.25/05/2001 मधील तरतुदी नुसार महिलांचे आरक्षण दर्शविण्यात आलेले आहे.
4. समांतर आरक्षण हे फक्त सरळसेवा भरतीस लागू राहील. समांतर आरक्षण हे सामाजिक आरक्षणांतर्गत आरक्षण असल्याने त्यास सामाजिक आरक्षणावर वाढीव म्हणून गणण्यात येणार नाही.
5. 30 टक्के महिला आरक्षणासाठी महिला उमेदवार न मिळाल्यास त्या-त्या प्रवर्गातील पुरुष उमेदवारामधुन पदे भरण्यात येतील.
6. जनगणना कर्मचारी, स्वातंत्र्य सैनिकांचे पाल्य, उमेदवारांना पसंतीक्रमानुसार प्राधान्य देण्यात येईल.

**7. अर्ज करण्याची पध्दतः -**

1. प्रस्तूत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.
2. सदर भरतीची जाहिरात www.beed.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
3. पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (web-based) ऑनलाईन अर्ज www.beed.nic.in या वेबसाईटव्दारे **दिनांक 15/05/2014 ते दिनांक 29/05/2014** या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील. ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकानंतर संकेतस्थळावरील लिंक बंद केली जाईल.
4. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सुचना www.beed.nic.inया वेबसाईटवर उपलब्ध आहेत. या वेबसाईटवर ऑनलाईन अर्ज परिपूर्ण भरल्यानंतर स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकेत फी भरण्याचे चलन 03 प्रतीमध्ये उपलब्ध होईल. (उमेदवाराची प्रत, बँकेची प्रत व जिल्हा निवड समितीची प्रत) सदर चलनाची प्रिंट काढून त्या चलनामार्फतच उमेदवारांने आवश्यकती फी स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेमध्ये भरणे आवश्यक राहील. सदरच्या तीन प्रतीपैकी उमेदवारास त्याची स्वतःची प्रत व जिल्हा निवड समितीची प्रत उमेदवारास स्टेट बँक ऑफ इंडिया, बँकेकडून परत मिळेल त्यापैकी जिल्हा निवड समितीची प्रत, अशा उमेदवाराने कागदपत्र छाननीचे वेळी जिल्हा निवड समितीकडे जमा करावी. सदर चलनाची मूळ प्रत असल्याशिवाय उमेदवाराची कागदपत्रे छाननी / मुलाखत घेतली जाणार नाही तसेच चलनाची मुळ प्रत परिक्षेच्या रोजी सोबत आणावी.
5. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करताना उमेदवाराजवळ स्वतःचा अद्ययावत (Latest) पासपोर्ट साईज फोटो व सही, स्वतःचा ई-मेल आयडी असणे आवश्यक आहे तसेच स्वतःचा फोटो जिल्हा निवड समितीच्या सुचनेनुसार विहित पध्दतीने स्कॅन करुन अपलोड करणे अनिवार्य आहे तसेच उमेदवाराकडे फोटो असलेले अधिकृत ओळखपत्र परीक्षेच्या दिवशी आणणे आवश्यक आहे. इंटरनेट सुविधा उपलब्ध करुन घेणे व अर्ज करणे ही उमेदवाराची जबाबदारी राहील.

**8. अटी व शर्ती :-**

# जिल्हाधिकारी कार्यालय, बीड (आस्थापना शाखा)

फोन क्र.०२४४२/२२२६०४ फॅक्स क्र.०२४४२/२२२०११


---

1. उमेदवाराचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्याने अर्ज करताना शैक्षणिक कागदपत्र, अन्य प्रमाणपत्र जोडणे आवश्यक नाही परंतू ऑनलाईन अर्जामध्ये संपूर्ण माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरताना काही त्रुटी राहील्यास व अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील याबाबत उमेदवारास तक्रार करता येणार नाही. तसेच ऑनलाईन अर्ज भरताना खोटी माहिती भरल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित उमेदवार फसवणूकीचा फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल. व गुणानुक्रमे गुणवत्ता यादीत आल्यास त्याचा दावा फेटाळाण्यात येईल.
2. उमेदवाराची लेखी परीक्षा ही कोणतीही कागदपत्रे पूर्व तपासणी न करता घेतली जाणार असल्यामूळे या परीक्षेत मिळालेल्या गुणाच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. कागदपत्रांच्या पूर्ण छाननीनंतरच उमेदवाराची गुणवत्तेच्या आधारे सामाजिक/समांतर आरक्षण निहाय मुलाखतीसाठी व अंतिम निवड केली जाईल.
3. जाहिरातीत दर्शविलेल्या पदासाठी परिक्षा खालील नमुद केलेल्या वेळापत्रकानुसार घेण्यात येईल.

| अ.क्र. | संवर्ग | लेखी परिक्षा दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| 1 | लिपिक - नि - टाकलेखक | 08/06/2014 | सकाळी 11-00 ते दुपारी 1-00 |
| 2 | वाहनचालक | 06/07/2014 | सकाळी 11-00 ते दुपारी 12-00 |
| 3 | शिपाई | 06/07/2014 | सकाळी 11-00 ते दुपारी 12-00 |
| 4 | तलाठी | 22/06/2014 | सकाळी 11-00 ते दुपारी 1-00 |

4. अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा व त्याबाबतचे सक्षम अधिकारी यांचेकडील प्रमाणपत्र त्यांचेकडे असणे आवश्यक आहे. अर्जदार यांचेकडे अधिवास प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास शासन महसूल व वन विभागाकडील निर्णय दिनांक 27 जून 2011 नुसार त्यांचेकडे महाराष्ट्र राज्यात जन्म झालेबाबतचा पुरावा असणे आवश्यक आहे.
5. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्रं. मकसी-1007/प्रक्रं.36/का/36 दि 10 जुलै 2008 नुसार महाराष्ट्र कर्नाटक सीमा भागातील दावा केलेल्या 865 गावातील 15 वर्षापासून रहिवाशी असल्याचा त्यांच्या वास्तव्यांचा सक्षम प्राधिका-यांचा विहीत नमुन्यातील दाखला लेखी परिक्षेनंतर गुणवत्ता यादीमध्ये येणाऱ्या उमेदवारांना सादर करणे अनिवार्य आहे.
6. उक्त पदांसाठी आवश्यक अर्हता असणारा महाराष्ट्र राज्यातील कोणताही उमेदवार अर्ज करु शकेल.
7. गुणवत्ता यादीत येणा-या उमेदवारांची मुळ कागदपत्राची तपासणी झाल्यानंतरच आवश्यक पदासाठी मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल. उमेदवारांना कागदपत्र तपासणीच्या वेळी मूळ प्रमाणपत्रे सादर करणे बंधनकारक राहील उमेदवाराने प्रमाणपत्र मिळणेकरिता सादर केलेल्या अर्जाच्या पावत्या ग्राहय धरल्या जाणार नाहीत. छाननीअंती प्रमाणपत्रांमध्ये त्रुटी/आढळल्यास/माहिती खोटी आढळल्यास मुलाखतीसाठी बोलाविले जाणार नाही व नियुक्तीही दिली जाणार नाही.
8. उक्त पदासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना लेखी परीक्षेसाठी परीक्षाकेंद्राचा सांकेतांक क्रमांक, वेळ व दिनांक इत्यादी तपशील www.beed.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल. लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र www.beed.nic.in या संकेतस्थळावरुन प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.
9. लेखी परीक्षेसाठी उमेदवारास परीक्षा केंद्रावर स्वखर्चाने यावे लागेल.
10. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र, बीड या कार्यालयात नाव नोंदणी केली असली तरी वरील पदासाठी विहित नमून्यात स्वंतत्रपणे रितसर ऑनलाईन अर्ज करणे व परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.
11. विहीत वयोमर्यादेतील इच्छुक शासकीय/निमशासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या कार्यालयीन प्रमुखांच्या परवानगीने भरावेत व अशा परवानगीची प्रत कागदपत्र तपासणीच्यावेळी सादर करणे आवश्यक राहील.
12. शासन सामान्य प्रशासन विभागाकडील निर्णय क्र. बीसीसी-2011/प्र.क्र.1064/2011/166-ब दिनांक 12/12/2011 नुसार निवड झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांना नियुक्तीच्या दिनांकापासून सहा महिन्याचे आत त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र संबंधित जात पडताळणी समितीकडून पडताळणी करुन घेणे आवश्यक आहे अन्यथा त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.
13. महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचीत जाती, अनुसूचीत जमाती, विमूक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागासवर्ग, इतर मागासवर्ग यांचेसाठी आरक्षण अधिनियम 2001 (सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्र.8) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक 29 जानेवारी 2004 पासून आमंलात आणला आहे. त्यानूसार उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेअर) तत्व विजाअ, भजब,

भजक, भजड, विमाप्र व इमाव यांना लागू आहे. सदर प्रवर्गातील उमेदवारांकडे 31/03/2015 पर्यंत वैध असलेले नॉन क्रिमिलेअरचे सक्षम अधिकारी यांचेकडील प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. नॉन क्रिमिलीअरचे तत्व अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती व्यतिरिक्त इतर सर्व मागास प्रवर्गाना लागू राहील.

14. उक्त नमूद पदासाठी घेण्यात येणाऱ्या लेखी परीक्षेमध्ये गुणवत्ता यादीत येणाऱ्या उमेदवारांना त्यांचे पदासाठी आवश्यक असणारे कागदपत्र पडताळणीच्या वेळी त्यांचे शैक्षणिक अर्हता, टंकलेखन प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबातचे (नॉन क्रिमिलेअर) सक्षम अधिकारी यांचे प्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र, संगणक हाताळणी अर्हता प्रमाणपत्र, जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नोंदणी केली असल्यास नोंदणी प्रमाणपत्र, शासकीय/निमशासकीय कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या विभागप्रमुखांच्या परवानगीने भरले असल्यास अशा परवानगीचे पत्र व इतर आवश्यक सर्व मुळ कागदपत्र सादर करणे अनिवार्य आहे. तसेच महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक दिनांक 1/7/2005 व महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन) नियम 2005 नुसार विहीत नमुन्यातील लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन विवाहित/अविवाहित उमेदवारांनी सादर करणे अनिवार्य आहे.
15. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र. प्रशिक्षण 2000/प्र.क्र.61/2001/39 दिनांक19 मार्च 2003 नुसार गट क संवर्गातील उमेदवारांना त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाचे आत शासनाने ठरवून दिलेली संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील अन्यथा त्यांच्या सेवा समाप्त होतील. (वाहनचालक संवर्ग वगळून.)
16. शासन वित्त विभाग निर्णय क्रं अनियो /10/05/126/सेवा 4/दिनांक 31/10/2005 नुसार दि. 1 नोंव्हेबर 2005 रोजी व त्यानंतर निवड होणा-या उमेदवाराचा नवीन परिभाषीत अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू राहील, त्यांना सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना (म्हणजे म.ना.सेवा (निवृत्तीवेतन) नियम 1982 व म. ना.से. (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम 1984) आणि सद्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू होणार नाही.
17. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नोंदणी केली असल्यास नोंदणी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.
18. शासकीय/निमशासकीय कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या विभागप्रमुखांच्या परवानगीने भरावे व अशा परवानगीची प्रत संबंधिताकडे असणे आवश्यक आहे.
19. उमेदवाराने निवड प्रक्रियेच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची शिफारस अथवा दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्याची उमेदवारी अपात्र ठरविण्यात येईल.
20. अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली, म्हणजे लेखी परिक्षेस बोलाविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे उमेदवारांनी समजू नये.
21. उमेदवारांना लेखी परिक्षा व मुलाखतीसाठी येण्या जाण्याचा खर्च स्वत: करावा लागेल.
22. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना www.beed.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**9. समांतर आरक्षणातंर्गत असलेल्या कोटयासाठी अटी व शर्ती:-**

**अ) अत्युच्च्य गुणवत्ताधारण खेळाडू उमेदवारासाठी :-**

अत्युच्च्य गुणवत्ताधारक खेळाडूंसाठी असलेले आरक्षण शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्रंमाक रक्रिधो-2002/प्रक्र 68/क्रियूसे-2 दिनांक 30 एप्रिल 2005 मधील तरतूदीनुसार राहील. खेळाडू प्रमाणपत्र हे राष्ट्रीय व राज्यस्तरीय शासन निर्णय परिशिष्ट अ मध्ये नमूद खेळाचे व प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्यांचे असावे.

**ब) अंशकालीन उमेदवारासाठी :-**

अंशकालीन उमेदवारांचे बाबतीत त्यांनी सुशिक्षित बेरोजगार अर्थसहाय्य योजनेअंतर्गत कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये 03 वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेले पाहीजे. तसेच सदरच्या अनुभवाची नोंद रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये केलेली असली पाहिजे. निवड झालेल्या अंशकालीन कर्मचाऱ्यांनी त्यांच्या अनुभवाची सेवायोजन कार्यालयाकडील प्रमाणपत्र उमेदवारास कागदपत्र तपासणीच्यावेळी सादर करणे आवश्यक राहील.

---

**क) माजी सैनिक उमेदवारासाठी :-**

गुणवत्तायादीमध्ये येणाऱ्या माजी सैनिक उमेदवारांनी जिल्हा सैनिक बोर्डात नावनोंदणी केली असल्यास प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत व इतर आवश्यक कागदपत्र तपासणीच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे.

**ड) भुकंपग्रस्त उमेदवारासाठी :-**

गुणवत्तायादीमध्ये येणाऱ्या भुंकपग्रस्त उमेदवारांनी सक्षम अधिकारी (जिल्हाधिकारी) यांचे भूकंपग्रस्त असलेबाबतचे शासकीय नोकरी मिळणेसाठी विहित केलेले प्रमाणपत्र कागदपत्र तपासणीच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे.

**इ) प्रकल्पग्रस्त उमेदवारासाठी :-**

गुणवत्तायादीमध्ये येणाऱ्या प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी सक्षम अधिकारी (जिल्हा पुनर्वसन अधिकारी) यांचे प्रकल्पग्रस्त असलेबाबतचे शासकीय नोकरी मिळणेसाठी विहित केलेले प्रमाणपत्र कागदपत्र तपासणीच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे.

**ई) महिला उमेदवारासाठी :-**

1. मागासवर्गीय प्रवर्गातील विजाअ, भ.ज.(ब) (क) (ड), वि.मा.प्र व इमाव या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती अथवा गटातील महिला सदस्यांना महिलांचे 30 टक्के आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही.(फक्त अनु.जाती व अनु.जमाती वगळून)
2. मागासवर्गीय प्रवर्गातील विजाअ, भ.ज.(ब) (क) (ड), वि.मा.प्र व इमाव या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती अथवा गटात मोडत नसलेल्या महिला सदस्यांनी महिलांच्या 30 टक्के आरक्षणासाठी सक्षम अधिकारी यांचे नॉन क्रिमिलिअर प्रमाणपत्राची प्रत, मुळ कागदपत्रांच्या छाननी वेळी सादर करणे बंधनकारक राहील.

## 10. परीक्षेचे स्वरुप व निवड पध्दती :-

| अ.क्र | संवर्ग | परीक्षेसाठी गुण | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | लेखी परीक्षा | व्यासाईक चाचणी परिक्षा | मौखिक परीक्षा | एकूण गुण |
| 1 | तलाठी | 200 | लागू नाही | लागू नाही | 200 |
| 2 | लिपीक-नि-टंकलेखक | 200 | लागू नाही | लागू नाही | 200 |
| 3 | वाहनचालक | 100 | 80 | 20 | 200 |
| 4 | शिपाई | 75 | लागू नाही | 25 | 100 |

## 11.परिक्षेचे स्वरुप :-

**अ) लिपीक-नि-टंकलेखक पदासाठी परिक्षेचे स्वरुप :-**

1. शासन सामान्य प्रशासन विभागाकडील निर्णय क्र. प्रनि.म.2007/प्रक्र46/07/13/अ दिनांक 19/10/2007 मधील तरतुदीनुसार लिपीक-नि-टंकलेखक पदासाठी लेखी परीक्षेमध्ये प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारावर निवड करण्यात येईल.
2. लिपीक-नि-टंकलेखक पदासाठी लेखी परीक्षेचा दर्जा महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक शालांत परीक्षेच्या दर्जाच्या समान असेल व लेखी परीक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्यज्ञान व अंकगणित या विषयावरील प्रश्नांकरिता प्रत्येकी 50 गुण ठेवून एकूण 200 गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल. सदरील लेखी परीक्षा वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाची असेल.

---

**ब) तलाठी पदासाठी परिक्षेचे स्वरुप :-**

1. शासन सामान्य प्रशासन विभागाकडील निर्णय क्र. प्रनि.म.2007/प्रक्र46/07/13/अ दिनांक 19/10/2007 मधील तरतुदीनुसार तलाठी पदासाठी पदवी ही कमीत कमी अर्हता असल्याने सदर पदासाठी परीक्षेचा दर्जा भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठाच्या पदवी परिक्षेच्या दर्जाच्या समान राहील. परंतू मराठी या विषयाच्या प्रश्नपत्रिकेचा दर्जा उच्च माध्यमिक शांलात परीक्षेच्या (इयत्ता 12 वी) च्या दर्जाच्या समान राहील व लेखी परीक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौध्दीक चाचणी या विषयावरील प्रश्नाकरिता प्रत्येकी 50 गुण ठेवून एकूण 200 गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल. सदरील लेखी परीक्षा वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाची असेल.

**क) वाहनचालक पदासाठी परिक्षेचे स्वरुप :-**

1. वाहनचालक पदासाठी १०० गुणांची लेखी, ८० गुणांची व्यावसायिक चाचणी व २० गुणांची मौखिक परीक्षा अशी एकुण २०० गुणांच्या परीक्षेमध्ये प्राप्त केलेल्या गुणाच्या आधारावर निवड करण्यात येईल. सदर पदासाठी लेखी परीक्षा ही सर्वसाधारण सामान्यज्ञान स्वरुपाची असेल. लेखी परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांसाठीच व्यावसायिक परिक्षा व मौखिक परिक्षा लागू राहील.

**ड) शिपाई पदासाठी परिक्षेचे स्वरुप :-**

1. शिपाई पदासाठी सर्वसाधारण स्वरुपाची 75 गुणांची लेखी व 25गुणांची मौखिक परीक्षा अशी एकुण 100 गुणांच्या परीक्षेमध्ये प्राप्त केलेल्या गुणाच्या आधारावर निवड करण्यात येईल. लेखी परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांसाठीच मौखिक परिक्षा लागू राहील.

**12. इतर महत्वाच्या सुचना :-**

- लेखी परीक्षेमध्ये उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या अधारे गुणवत्तेनुसार अंतिम निवडीसाठी उमेदवारांना शैक्षणीक व इतर संबंधित मूळ प्रमाणपत्रे तपासणीसाठी उपलब्ध करून द्यावी लागतील. अन्यथा अंतिम निवडीसाठी विचार केला जाणार नाही. मौखिक परीक्षेसाठी उमेदवार गैरहजर राहील्यास उमेदवाराची निवड करण्यात येणार नाही.
- वरील सर्व पदासाठी गुणवत्ता यादीत अंतर्भाव करण्यासाठी उमेदवारांनी एकूण गुणांच्या किमान 45% गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.
- लेखी परीक्षेस बसलेल्या उमेदवारांना त्यांना मिळालेल्या गुणांची यादी www.beed.nic. या संकेस्थळावर जाहीर केली जाईल या गुणवत्ता यादीतून सामाजिक/समांतर आरक्षणनिहाय अंतरिम गुणवत्ता यादी उक्त संकेतस्थळावर जाहीर केली जाईल.
- परीक्षेत ज्या उमेदवारांना समान गुण असतील, अशा अमेदवारांचा गुणवत्ताक्रम सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दि. 27 जून 2008 मधील नमूद निकषावर क्रम लावला जाईल.
- वरील गुणवत्ता यादीमधील गुणानुक्रमे पात्र व आरक्षण विचारात घेवून कागदपत्र पडताळणीसाठी पात्र करण्यात आलेल्या उमेदवारांनी संकेतस्थळावर दिलेल्या सूचनानुसार त्यांच्या कागदपत्र छाननीसाठी ठरवून दिलेल्या दिनांकास, वेळेवर व ठरवून दिलेल्या ठिकाणी मूळ कागदपत्रे व छायाकिंत प्रतीसह उपस्थित राहणे आवश्यक राहील. सदर दिवशी वेळेत व ठिकाणी सदर उमेदवार कागदपत्र छाननीसाठी अनुपस्थित राहील्यास त्यांचे निवडीबाबत जिल्हा निवड समिती विचार करणार नाही.
-

# जिल्हाधिकारी कार्यालय, बीड (आस्थापना शाखा)

फोन क्र.०२४४२/२२२६०४ फॅक्स क्र.०२४४२/२२२०११


---

**13. भरती प्रक्रियेचा कार्यक्रम खालील प्रमाणे आहे :-**

| अ.क्र | भरती प्रकिया कार्यक्रम | संभावित दिनांक |
|---|---|---|
| 1 | जाहिरात दिनांक | दिनांक 13/05/2014 |
| 2 | अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरण्याचा कालावधी | दिनांक 15/05/2014 ते दिनांक 29/5/2014 |
| 3 | चलनाने शुल्क (फी) भरण्याची अंतिम तारीख | दिनांक 30/05/2014. |
| 4 | लेखी परीक्षेसाठी ऑनलाईन प्रवेशपत्र उपलब्ध होण्याचा कालावधी (लिपिक नि टंकलेखक, संवर्गासाठी) | दिनांक 03/06/2014 पासुन लेखी परीक्षेच्या दिनांकापर्यंत |
| 5 | लेखी परीक्षेसाठी ऑनलाईन प्रवेशपत्र उपलब्ध होण्याचा कालावधी (तलाठी वाहनचालक व शिपाई संवर्गासाठी) | दिनांक 15/06/2014 पासुन लेखी परीक्षेच्या दिनांकापर्यंत |
| 6 | लेखी परीक्षा (लिपिक नि टंकलेखक ) | दिनांक 08/06/2014रोजी |
| 7 | लेखी परीक्षा (तलाठी संवर्गासाठी) | दिनांक 22/6/2014रोजी |
| 8 | लेखी परीक्षा ( वाहनचालक व शिपाई संवर्गासाठी) | दिनांक 06/07/2014रोजी |

**14. अर्जदार यांना अर्ज भरण्याबाबत काही अडचणी आल्यास 8793083712 / 8793083713 या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा.**

**स्वाक्षरीत/-**
**जिल्हाधिकारी बीड**
**तथा अध्यक्ष, जिल्हा निवड समिती, बीड**

**दिनांक :- 13/05/2014**
**स्थळ :- बीड**